IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
ISSN 2455-4375

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ ग्रंथालय संसाधने आणि सेवा-सुविधा चा आढावा

**प्रा. वैशाली श्याम पाटील**
संधोधनकर्ती
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. धनंजय वामनराव देवते**
मार्गदर्शक
बॅरी. शेषराव वानखेडे मोहपा

---

***सारांश :***

*विदर्भातील कृषी शिक्षण, संशोधन व विस्तार सेवांचे प्रमुख केंद्र डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, हे अकोला येथे आहे. १९६९ मध्ये स्थापन झालेले विद्यापीठाचे मध्यवर्ती ग्रंथालय आज माहिती केंद्र म्हणून कार्यरत आहे. येथे १.७० लाखांहून अधिक पुस्तके, ९८७६ शोधनिबंध, तसेच CeRA, Krishiprabha, Wiley, EBSCO यांसारख्या आंतरराष्ट्रीय डिजिटल डेटाबेसचा समावेश आहे. १९८७ पासून FAO डिपॉझिटरी ग्रंथालय म्हणून कार्य करत असून जागतिक कृषी माहिती सहज उपलब्ध करून देते. CD-ROM, OPAC, संदर्भ सेवा, दस्तऐवज वितरण, वाचन व्यवस्था अशा सुविधा संशोधनासाठी मूल्यवान ठरतात. कृषी पत्रिका आणि कृषी संवादिनी या प्रकाशनांमुळे शेतकऱ्यांपर्यंत माहितीचा प्रसार केला जातो. या लेखामध्ये ग्रंथालयाच्या रचना, सेवा, आणि कृषी शिक्षणाचा सखोल अभ्यास करून, आधुनिक कृषी ग्रंथालय व्यवस्थापनाचा आदर्श नमुना कसा आहे, हे स्पष्ट करण्यात आले आहे.*

**मुख्य संज्ञा** : कृषी विद्यापीठ, केंद्रीय ग्रंथालय, ग्रंथालय सेवा, ग्रंथालय सदस्यत्व, डिजिटल संससाधने, माहिती व्यवस्थापन.

---

**प्रस्तावना :**

दर्जेदार शिक्षण देणे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिली संस्था आहे. जिने संपूर्ण महाराष्ट्र भर कृषी विकासाला बदलून विस्तार सेवा प्रदान केली आहे. ग्रंथालयाने विद्यार्थ्यांना साहित्य उपलब्ध करून देणे मिळवलेल्या साहित्यावर सोपस्कार करून संघटित करणे आणि ती नंतरच्या पिढीपर्यंत सुपूर्त करणे. तसेच विशेष ग्रंथ आणि दुर्मिळ पुस्तके देखील ग्रंथालयात संग्रहित करून ठेवणे ग्रंथाल्यातील संग्रह सतत सुधारणा आणि पुनर्जीवित करत राहणे . जेणेकरून ते विद्यार्थी संशोधक आणि शिक्षकांच्या समुदायाला उपयोगी पडतील यासाठी ग्रंथालय सुसज्ज आणि भविष्यासाठी जतन करून ठेवणे. उच्च स्तरावर कृषी विभागामध्ये इतर मार्गाने सुधारण्यासाठी माहिती प्रदान करून संशोधन कसे करावे हे शिकवले जाते ग्रामीण जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात लक्षणीय सुधारणा घडवून आणून उत्पादन पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे

**उद्देश :**

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ हे भारतातील नामांकित अशा कृषी विद्यापीठांपैकी एक विद्यापीठ

म्हणून कार्यरत आहे. या विद्यापीठातील माहितीचे खरे स्रोत हे तेथील ग्रंथालय आहे. म्हणून या ग्रंथालयाची पारंपरिक अथवा ऑटोमेशनवर आधारित आधुनिक अशी ग्रंथालय संसाधने आणि सेवा सुविधा पद्धती समजून घेणे हा देखील या संशोधन लेखाचा उद्देश आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून यात गुणात्मक विश्लेषणावर भर दिलेला आहे. याखेरीज दुय्यम प्रकारच्या प्रकाशित व अप्रकाशित माहिती चा वापर केला गेला आहे. त्यात विद्यापीठाचे वार्षिक अहवाल, ग्रंथालयविषयक प्रकाशित दस्तऐवज, विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाइटवरील माहिती, यूजीसी/ICAR इ. संस्थांचे रिपोर्ट्स संबंधित शोधनिबंध, लेख व पुस्तके सारख्या स्रोतांचा वापर करून माहितीचे विश्लेषण केले आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची माहिती व वाढ :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला ची स्थापना 20 सप्टेंबर 1969 रोजी अकोला येथे झाले या विद्यापीठाचे नाव विदर्भाचे सुपुत्र पंजाबराव भाऊसाहेब देशमुख यांच्या नावावर ठेवण्यात आले ते त्यावेळेस कृषिमंत्री होते या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र विदर्भातील वेगवेगळ्या ११ जिल्ह्यात पसरले आहे कृषी विद्यापीठाकडे कृषी शिक्षण संशोधन आणि विस्तार कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विद्यापीठाचे मुख्य परिसर अकोला येथे आहे. कृषी महाविद्यालय कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय वनीकरण फलोत्पादन महाविद्यालय आणि पदवीधर संस्था या पाच महाविद्यालयांमध्ये मुख्य विद्यापीठातर्फे शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात. चार पदवी कार्यक्रम म्हणजेच बीएससी एग्रीकल्चर, बीएससी वनशास्त्र, बी टेक, आणि पदव्युत्तर पदवी कार्यक्रम, तसेच इंजीनियरिंग आणि कृषी विद्याशाखांमध्ये डॉक्टरेट पदवी कार्यक्रम राबविण्यात येतो.

तसेच विद्यापीठाचे उपकेंद्रे नागपूर, गडचिरोली आणि यवतमाळ येथे आहेत. विद्यापीठाच्या क्षेत्राखाली दोन सलग्नित महाविद्यालय आणि 14 खाजगी विनाअनुदानित महाविद्यालय आहे. मुख्य कॅम्पस मध्ये केंद्रीय संशोधन केंद्र आहे जे कापूस ज्वारी तेलबिया या प्रदेशातील मुख्य पिकांच्या पीक शास्त्रज्ञाने हाती घेतलेल्या संशोधन प्रकल्पाची गरज भागवते . नागपूर येथील कृषी महाविद्यालयास ११० वर्षांहून अधिकचा इतिहास आहे. जे बी एस सी ॲग्री पदवी कार्यक्रम घेतात. नागपूरच्या परिसरामध्ये एक भाग आहे जो महाराज भाग म्हणून आपण सगळे ओळखतो. नैसर्गिक सौंदर्याने वेडलेले आहेत. त्यात एक व्यवस्थित प्राणी संग्रहालय सुद्धा आहे. जे शहरातील नागरिकांसाठी खुले असल्यामुळे आकर्षणाचा विषय आहे संशोधन कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी 22 हेक्टर ग्रीन हाऊस सह स्वतंत्र बॉटनिकल गार्डन तयार केले गेले आहे. कृषी विषयावर शिक्षण देणे आणि संशोधनाला नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रशिक्षित विद्यार्थी तयार करणे आणि विशेषतः शेतकरी समुदायाच्या बदलत्या गरजांसाठी कृषी शिक्षण खुले करणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठीय मध्यवर्ती ग्रंथालय :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची मध्यवर्ती ग्रंथालय व माहिती केंद्राची स्थापना १९६९ साली कृषी महाविद्यालयात झाली व १९८० मध्ये पदव्युत्तर शिक्षण व संशोधन संस्थेच्या मुख्य इमारतीत हलविण्यात आले. हे ग्रंथालय सुमारे ७२,८२५ चौरस फूट क्षेत्रफळावर असून त्यात ५२,४३५ चौरस फूट वापरयोग्य जागा आहे. येथे कृषी, पशुवैद्यक, कृषी अभियांत्रिकी, कृषी जैवतंत्रज्ञान, शुद्ध व अनुप्रयुक्त विज्ञान तसेच एफ.ए.ओ.च्या विशेष संग्रहासह इतर संलग्न विषयांवरील १५७००० हजारांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. याशिवाय विविध संस्थांकडून भेटरूपात दरवर्षी १५० हून अधिक नियतकालिके प्राप्त होतात. १९८७ पासून हे ग्रंथालय एफ.ए.ओ.च्या प्रकाशनांचे अधिकृत साठागृह आहे. हे विदर्भातील सर्वात मोठे कृषी माहिती स्रोत केंद्र असून राज्यातील अनेक वैज्ञानिक, सामाजिक व ऐतिहासिक संशोधकांसाठी उपयुक्त आहे

**ग्रंथालय संसाधने आणि सेवा सुविधा** :

आजच्या माहितीच्या युगात शिक्षण व संशोधन क्षेत्रात ग्रंथालयांची भूमिका मूलभूत ठरते. शिक्षणसंस्था, विशेषतः उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्था, आपल्या ग्रंथालयांद्वारे विद्यार्थ्यांना व संशोधकांना केवळ पुस्तकं नव्हे, तर डिजिटल माध्यमातून विविध प्रकारची माहिती उपलब्ध करून देतात. बदलत्या तंत्रज्ञानासोबत ग्रंथालयांची कार्यपद्धतीही बदलत चालली आहे. पारंपरिक ग्रंथालय व्यवस्थेपासून ई-ग्रंथालय, डिजिटल डेटाबेस, ओपन ॲक्सेस पोर्टल्स याकडे झुकणं हे या बदलाचे प्रमुख लक्षण आहे. विशेषतः कृषी व तंत्रशिक्षणाशी संबंधित विद्यापीठांमध्ये संशोधनाचा वेग आणि स्वरूप अधिक व्यापक असतो. त्यामुळे तिथल्या ग्रंथालय व्यवस्थेला अधिक सक्षम, अद्ययावत आणि उपयोगी बनवणं ही काळाची गरज बनली आहे. अशा ग्रंथालयांची सेवा, त्यांचं धोरणात्मक व्यवस्थापन, डिजिटल साधनांचा वापर, आणि त्यांच्या अडचणींचा अभ्यास करून या संस्थात्मक यंत्रणांची परिणामकारकता मोजणं गरजेचं ठरतं.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे मध्यवर्ती ग्रंथालय हे वापरकर्त्यांच्या विविध गरजांनुसार कार्यक्षमतेने रचलेले आहे. सुमारे १.५७ लाखांहून अधिक पुस्तके आणि अन्य वाचन साहित्य असलेले हे ग्रंथालय विविध विभागांमध्ये विभागले गेले आहे, जेणेकरून माहिती सहज उपलब्ध होऊ शकेल. या ग्रंथालयामध्ये कृषी, संबंधित विज्ञानशाखा आणि तांत्रिक विषयांवरील विस्तृत साहित्यसंग्रह आहे. १९८७ पासून अन्न व कृषी संस्था (FAO) च्या प्रकाशनांचे डिपॉझिटरी ग्रंथालय म्हणून नामनिर्देशित झाल्यामुळे, या संस्थेचे विविध प्रकाशन ग्रंथालयात नियमितपणे प्राप्त होतात, त्यामुळे संग्रह अधिक समृद्ध झाला आहे. विद्यार्थ्यांचे, संशोधकांचे आणि प्राध्यापकांचे शैक्षणिक आणि संशोधन कार्य यांना समर्थ आधार मिळावा यासाठी ग्रंथालयाची रचना करण्यात आलेली असून, हे अध्ययन व ज्ञानसंपादनासाठी पोषक असे वातावरण निर्माण करते. ग्रंथालयात विषयानुसार वर्गीकरण केलेले विविध विभाग आहेत, ज्यात ग्रंथसंच विभाग, संदर्भ विभाग, नियतकालिक विभाग, वाचनकक्ष, तसेच डिजिटल व माहिती तंत्रज्ञान विभाग यांचा समावेश आहे. या सर्व विभागांचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि प्राध्यापकांना त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक गरजांनुसार माहिती सहजपणे उपलब्ध करून देणे. ग्रंथालयात प्रवेशयोग्य जागा, शांतीपूर्ण वाचनासाठी स्वतंत्र व्यवस्था आणि संगणकीकृत प्रणाली (OPAC व KOHA) यांद्वारे माहितीच्या जलद उपलब्धतेसाठी आधुनिक सोयी-सुविधा

दिल्या आहेत. विशेषतः FAO च्या प्रकाशनांसाठी स्वतंत्र विभाग असून, जागतिक कृषीविषयक माहितीचा सहज प्रवेश मिळतो. ही रचना ग्रंथालयाला केवळ पुस्तके साठवणारी जागा न राहता, एक ज्ञानकेंद्र म्हणून घडवते.

१) "होल्डिंग्स अँड सेक्शन्स" हा एक महत्त्वपूर्ण विभाग असून, यामध्ये अत्यंत विविध आणि माहितीपूर्ण साहित्याचा समावेश आहे. या विभागात संदर्भ ग्रंथ, पाठ्यपुस्तके, मनोरंजनपर साहित्य, शोधनिबंध, नियतकालिकांची मागील खंडे, परिषदांचे, कार्यशाळांचे आणि चर्चासत्रांचे कार्यवृत्त, संशोधन अहवाल, तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचे विशेष प्रकाशनांचा समावेश केला आहे. विशेषतः FAO, WHO, ILO, UNESCO, ICAR, AIU, UGC, AICTE यांसारख्या नामांकित संस्था व शैक्षणिक संघटनांची प्रकाशनेही या विभागात संग्रहित आहेत. या साहित्याचा वापर विद्यार्थ्यांपासून ते संशोधकांपर्यंत सर्वांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. हा विभाग ग्रंथालयाच्या शैक्षणिक व संशोधनात्मक गरजांची पूर्तता करणारा आधारस्तंभ आहे आणि माहितीच्या व्यापकतेतून ज्ञानवृद्धीसाठी प्रभावी स्रोत म्हणून कार्य करतो.

२) ग्रंथालयात संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त अशा विविध सेवा कार्यरत आहेत, ज्यांचा विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी सक्रियपणे लाभ घेतलेला आहे. गृहवाचनासाठी एकूण ७८०४ पुस्तके दिली गेली असून, ३५७ पुस्तके वाचनगृहात संदर्भासाठी वापरण्यात आली. ही आकडेवारी दर्शवते की ग्रंथालयातील मुदतवाढ सेवा केवळ औपचारिक स्वरूपाची नसून, अभ्यासक वर्गासाठी अत्यंत उपयुक्त आहे. तसेच, ग्रंथालयात २०० विद्यार्थ्यांसाठी वाचनक्षमता असूनही, वर्षभरात १९३५ विद्यार्थ्यांनी वाचनगृह वापरले, म्हणजे सरासरीने दिवसागणिक जवळपास ५-६ विद्यार्थी नियमित वाचनासाठी उपस्थित होते, हे दर्शवते की अभ्यासासाठी ही जागा नियमित वापरात आहे.

३) दुसऱ्या बाजूला, संदर्भ विभागात विश्वकोश, शब्दकोश, हँडबुक्स, नकाशे, निर्देशिका, गॅझेटीअर्स व वर्षपुस्तकांचा समावेश असून, हे साहित्य विशेषतः प्रबंध लेखन, सखोल अभ्यास व विश्लेषणासाठी आवश्यक असते. याशिवाय, फोटोस्टेट (झेरॉक्स) सेवेद्वारे २०२२-२३ मध्ये १३,३१२ प्रती ३२१ वापरकर्त्यांना दिल्या गेल्या. याचा अर्थ, सरासरी एका वापरकर्त्याने सुमारे ४० प्रती घेतल्या, जे संशोधनासाठी लेख, तक्ते, आकृत्या यांचे महत्त्व अधोरेखित करते. या आकडेवारीवरून स्पष्ट होते की, ग्रंथालयाची रचना, विभाग व सेवा या सर्वांनी मिळून संशोधनास पूरक असे एक माहितीसमृद्ध आणि वापरकर्ता-केंद्रित वातावरण निर्माण केले आहे.

४) कृषी विद्यापीठाच्या "Extension Publications" विभागाने कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी अतिशय प्रभावी कार्य केले आहे. या विभागातून शेतकऱ्यांसह कृषी विकासाशी संबंधित सर्व घटकांसाठी वेळोवेळी आवश्यक अशा माहितीपूर्ण व उपयुक्त प्रकाशनांची निर्मिती करण्यात येते. विभागाची प्रमुख मासिक प्रकाशन म्हणजे "कृषी पत्रिका", जी दरमहा ३००० प्रतींच्या खपासह नियमित प्रसिद्ध होते. हे मासिक शेतकऱ्यांसाठी चालू घडामोडी, सुधारित तंत्रज्ञान आणि कृषीविषयक मार्गदर्शनाचे महत्त्वाचे माध्यम आहे.

५) या विभागाची आणखी एक लोकप्रिय व वार्षिक प्रकाशन म्हणजे "कृषी संवादिनी", जी विद्यापीठाच्या

डायरीच्या स्वरूपात असून, खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांचे सुधारित पद्धती, बागायती पिके, पशुपालन, कृषी अभियांत्रिकी, मृद व जलसंधारण, अन्नप्रक्रिया व विपणन या क्षेत्रांतील अद्ययावत माहिती पुरवते. मागील दहा वर्षांत या प्रकाशनाच्या १.५ लाख प्रतींची विक्री झालेली आहे, जी याच्या लोकप्रियतेचे आणि विश्वासार्हतेचे प्रमाण ठरते.

६) याव्यतिरिक्त, विभागाद्वारे शेतकऱ्यांच्या गरजेनुसार विविध फोल्डर्स, लीफलेट्स, पुस्तिका, पोस्टर्स यांची निर्मिती केली जाते.. या प्रकाशनांचे वितरण ATIC (Agricultural Technology Information Centre), कृषी विज्ञान केंद्रे (KVKs), संशोधन केंद्रे व कृषी सेवा केंद्रे यांच्यामार्फत ११ जिल्ह्यांमध्ये केले जाते, ज्यामुळे या माहितीचा प्रसार अधिक व्यापक प्रमाणावर होतो

**सदस्यत्व (Membership) :**

विद्यापीठाचा ग्रंथालय विद्यापीठाच्या विविध अधिकाऱ्यांना, शिक्षक वर्गाला, विविध पदवीपूर्व (Undergraduate) आणि पदव्युत्तर (Postgraduate) विभागातील विद्यार्थ्यांना, संशोधन कार्यरत विद्यार्थी (Ph.D. Scholars), विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना सदस्यत्व प्रदान करते.

याशिवाय, विद्यापीठाशी संबद्ध नसलेल्या महाविद्यालयांतील तसेच इतर विद्यापीठांतील वापरकर्त्यांना कोणतेही शुल्क न घेता आकस्मिक (Casual) सदस्यत्वही दिले जाते. आर्थिक अडचणी न येण्यासाठी ही सेवा उपलब्ध करून देण्यात येते. वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यापीठाच्या ग्रंथालयाने एकूण १४२७ सदस्यांना सदस्यत्व दिले आहे.

वर्षभरातील **१४२७ सदस्य** हे प्रमाण ग्रंथालयाच्या व्यापक वापराचे सूचक आहे. विशेषतः पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा मोठा भाग (१४२७ + ४६३ = १८९०) असल्याने, ग्रंथालयाचा वापर मुख्यतः शैक्षणिक अभ्यासासाठी होत असल्याचे दिसून येते. संशोधन कार्यात असलेल्या पीएच.डी. विद्यार्थ्यांचा सदस्यत्वाचा आकडा ५२६ असून, हा वर्ग ग्रंथालयातील विशेष साहित्याचा वापर करतो, जो संशोधनाला चालना देतो.

**ग्रंथालयीन सेवा सुविधा :**

**1. दस्तऐवज वितरण सेवा (Document Delivery Services) :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ग्रंथालयात संशोधनार्थ आवश्यक माहिती पुरवण्यासाठी CD-ROM डेटाबेस शोध सेवा उपलब्ध आहे. ही सेवा वापरकर्त्यांना विविध क्षेत्रातील सखोल व विश्वासार्ह संशोधन माहिती सुलभ करण्यासाठी वापरली जाते. ग्रंथालयाकडे एकूण ४२ CD-ROM डेटाबेस उपलब्ध आहेत, जे १९३९ पासून चालू असलेल्या संशोधन डेटा पासून ते ताज्या कृषी व वैज्ञानिक विषयांवर आधारित माहितीपर आहेत. या डेटाबेसमध्ये CAB CD, AGRICOLA, AGRIS, Biotechnology Abstracts, Food Science & Technology Abstracts, Water Resources Abstracts, Zoological Records

इत्यादी महत्त्वाच्या विषयांचे डेटा संग्रह आहेत. या डेटाबेसच्या माध्यमातून संशोधकांना हजारो संशोधन लेख, तांत्रिक अहवाल, वैज्ञानिक नोंदी आणि क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळते, ज्यामुळे त्यांचे संशोधन अधिक गहन व समृद्ध होते.

**अद्ययावत डिजिटल व माहिती तंत्रज्ञावर आधारित सेवा :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे ग्रंथालय हे आधुनिक माहिती व तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल सेवेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ग्रंथालयाने CeRA, Wiley, EBSCO Host, आणि CAB Abstracts यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ऑनलाइन डेटाबेससह सुमारे १५००० ते २०००० मुक्त प्रवेश जर्नल्स, ३९५१ CeRA जर्नल्स, ६८७ CABI ई-पुस्तके, आणि Krishiprabha e-theses यांचा प्रवेश उपलब्ध करून दिला आहे. याशिवाय, ४२ CD-ROM डेटाबेस, OPAC, Internet Search Facility, Selective Dissemination of Information, आणि Current Awareness Services यांसारख्या संगणकीकृत व सेवा-आधारित पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. २०२२-२३ अखेरपर्यंत ग्रंथालयात एकूण १७१४५९ पुस्तके व दस्तऐवज, त्यात २०२६ ई-पुस्तके आणि ९११३ शोधनिबंध यांचा समावेश आहे.

या डिजिटल सेवांमुळे विद्यार्थ्यांना, संशोधकांना व शिक्षकांना अद्ययावत, दर्जेदार आणि वेळेत माहिती मिळणे शक्य झाले आहे. पारंपरिक मुद्रित साहित्याबरोबरच डिजिटल माहितीचा समन्वय केल्यामुळे ग्रंथालय एक ज्ञानसंपन्न, वापरकर्ता-केंद्रित व संशोधनाभिमुख माहिती केंद्र म्हणून कार्य करत आहे. तांत्रिक सेवा जसे की ब्लिओग्राफिक शोध, इंटरलायब्ररी लोन, रेफरन्स सेवा, आणि रेप्रोग्राफी यामुळे वापरकर्त्यांचा अनुभव अधिक समृद्ध होत आहे. एकंदरीत, ग्रंथालयाची माहिती-तंत्रज्ञान आधारित सेवा शैक्षणिक व संशोधन कार्याला अधिक गतिमान, सुसंगत आणि दर्जेदार बनवते.

**संशोधन सेवा :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे ग्रंथालय संशोधनासाठी आवश्यक असलेल्या विविध सेवा व माहिती स्रोतांनी समृद्ध आहे. ग्रंथालयात ९११३ शोधनिबंध, तसेच Krishiprabha e-theses या पोर्टलवर उपलब्ध ई-शोधनिबंध हे नवोदित संशोधकांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. याशिवाय CeRA (३९५१+ जर्नल्स), Wiley (४१), EBSCO (६२५) व १५००० ते २०००० मुक्त प्रवेश जर्नल्स यांसारख्या सेवांमुळे संशोधकांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन लेख सहज उपलब्ध होतात. CD-ROM डेटाबेस (२२ विषयांवर आधारित, १९३९ पासूनचा डेटा) आणि बायब्लिओग्राफिक शोध सेवा संशोधन साहित्याचा गाभा समजून घेण्यासाठी आधार देतात.

त्याचप्रमाणे, FAO Depository Collection (१९८७ पासून), Reference Section (विश्वकोश, कोश, अटलास इ.) आणि Reprography सेवा (२०२२-२३ मध्ये १३,३१२ प्रती वितरित) या सर्व सुविधा एकत्रितपणे संशोधनाला पुरक आधारभूत पायाभूत सुविधा प्रदान करतात. या सेवांमुळे संशोधकांना पारंपरिक व

अद्ययावत साहित्याचा समतोल वापर करता येतो, संदर्भ सहज मिळतो, आणि माहिती मिळवण्याची प्रक्रिया वेगवान होते.

ग्रंथालयात **Krishiprabha e-theses** पोर्टलद्वारे विद्यापीठाच्या संशोधन प्रबंधांचा ऑनलाइन प्रवेश दिला जातो. याशिवाय, ग्रंथालय **शोधगंगा (Shodhganga – INFLIBNET), Vidyanidhi Digital Library, Digital Repository of Science and Technology, The Networked Digital Library of Theses and Dissertations (NDLTD), Virginia Tech, Western Virginia University Repository,** आणि **DART-Europe E-theses Portal** यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील ई-शोधनिबंध साठ्यांशी संलग्न आहे. यामुळे संशोधकांना जागतिक स्तरावरील शोधनिबंधांपर्यंत थेट आणि जलद प्रवेश मिळतो.

**निष्कर्ष :**

वरील विश्लेषणाच्या आधारित विद्यापीठ ग्रंथालयाच्या संदर्भातील निष्कर्ष पुढील प्रमाणे येतात.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ हे विदर्भातील कृषी शिक्षण, संशोधन व शेतीविषयक ज्ञानप्रसाराचे एक प्रमुख केंद्र आहे. अकोला येथील मुख्य केंद्रासह नागपूर, गडचिरोली व यवतमाळ येथे उपकेंद्रे असून, या संपूर्ण यंत्रणेच्या माध्यमातून विद्यापीठ कृषी शिक्षणाची व्यापक व्याप्ती साधते. विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांत कृषी, बागायती, वनशास्त्र, कृषी अभियांत्रिकी इत्यादी शाखांतील उच्च शिक्षण दिले जाते. तसेच, कृषी संशोधन केंद्रे व "Extension Publications" विभागाच्या माध्यमातून नवतंत्रज्ञान व आधुनिक शेतीच्या पद्धती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या जातात. "कृषी पत्रिका" आणि "कृषी संवादिनी" या प्रकाशनांद्वारे प्रादेशिक पातळीवर शेतीसंबंधित माहितीचा प्रसार होतो, ज्यामुळे विद्यापीठाचा शेतकऱ्यांशी थेट संवाद प्रस्थापित होतो.

विद्यापीठाचे मध्यवर्ती ग्रंथालय हे केवळ माहितीचे साठवणूक केंद्र न राहता, संशोधनस्नेही व वापरकर्ता-केंद्रित माहिती केंद्र म्हणून विकसित झाले आहे. या ग्रंथालयात १.५७ लाखांहून अधिक पुस्तके, ९११३ शोधनिबंध, ४२ CD-ROM डेटाबेस, तसेच CeRA, Wiley, EBSCO, Krishiprabha आणि Shodhganga यांसारख्या जागतिक दर्जाच्या डेटाबेससाठी डिजिटल प्रवेश उपलब्ध आहे. तसेच, FAO च्या डिपॉझिटरी विभागामुळे जागतिक कृषी विषयक माहिती सहज उपलब्ध होते. विषयवार विभाग, संगणकीकृत प्रणाली, शांत वाचन व्यवस्था, संदर्भ साहित्य व दस्तऐवज वितरण सेवा यांमुळे हे ग्रंथालय संशोधनासाठी आदर्श ठरते. एकूणच, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि त्याचे ग्रंथालय हे विदर्भातील कृषी शिक्षण व संशोधनासाठी एक सशक्त, आधुनिक व गतिमान आधारस्तंभ आहे.

**संदर्भ :**


- Case Study of Maharashtra. *Indian Journal of Library and Information Science, 8(1):* January, 2014, 86-89.

- Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapith- VISION-2025: University Publication No. Booklet/Dr. PDKV/PUB/533/September 2018.
- Harinitha, P. (2016). Library Services in India.
- Kartikeyan, R., Indianraj, N., & Vishnu, L. (2022). Role of Library Science in Agricultural College: A Case Study. *International Journal of Research and in Library Science, 8(4):* Oct.-Dec. 2022, pp. 52.
- Mudhe, B.T. (2014). Periodical Collection Development in Agricultural University Libraries. Case Study of Maharashtra. *Indian Journal of Library and Information Science, 8(1):* January, 2014, 86-89.
- https://www.getmyuni.com/college/dr-panjabrao-deshmukh-krishi-vidyapeeth-dpdkv-akola-facilities.
- https://www.pdkv.ac.in/Circulars/Vision-2050.pdf.
- https://pdkvu.in.
- https://www.pdkv.ac.in/Circulars/Recom-2019English.pdf.
- https://www.pdkv.ac.in/?page_id=1772.
- https://sustain.org/dr-panjabrao-deshmukh-krishi-vidyapeeth-and-the-institute-for-sustainable-communities-join-hands.
- https://www.getmyuni.com/college/dr-panjabrao-deshmukh-krishi-vidyapeeth-dpdkv-akola-facilities.